## निशाणी क्र. ६९ वरील आदेश

वादीने प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.४ विरूध्द् झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द करून प्रतिवादी क्र.४ चे वारस अभिलेखावर घेणेसाठी दाखल केला आहे. त्याच्या म्हणण्यानुसार प्रतिवादी क्र.४ हे मुंबई येथे दि. ०९/०३/२०१८ इ. रोजी मयत झाले आहेत. सदर प्रतिवादीच्या मृत्युबाबत वादी याला माहिती न मिळाल्यामुळे सदर प्रतिवादीचे वारस मुदतीत दाखल करता आले नाहीत. त्यामुळे सदर प्रतिवादीविरूध्द् दावा अबेट झाला आहे. प्रस्तुत दावा वाटपासाठी असल्यामुळे वादी व प्रतिवादी मधील वादाचे अंतिम निराकरण होण्यासाठी मयत प्रतिवादीचे वारसांना दाव्याचे कामी समाविष्ट करणे आवश्यक आहे. त्यामुळे अबेटमेंटचा आदेश रद्द करून प्रतिवादी क्र.४ चे वारस दाखल करून घेण्याची विनंती वादीने केली आहे.

२. प्रतिवादी क्र.४ चे वारसांनी सदर अर्जास म्हणणे दाखल केले आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार अर्ज कायदेशीर तरतूदीखाली नाही. सबब, अर्ज नामंजूर करणेची विनंती त्यांनी केली आहे.

३. वादी व प्रतिवादी क्र.४ चे वारसांतर्फे विद्वान विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला.

४. प्रतिवादी क्र. ४ हे दिनांक ०९/०३/२०१८ इ. रोजी मयत झाले आहेत, असे दिसून येते. वादी याने सदरचा अर्ज दि. १३/०६/२०१८ इ. रोजी दाखल केला आहे. वादी याने सदरचा दावा वाटपासाठी व पृथक कब्जासाठी दाखल केला आहे. सदर दाव्यास प्रतिवादी क्र. ४ चे वारस हे आवश्यक पक्षकार आहेत. वादी याने सदर अर्जासोबत शपथपत्र सादर केले आहे. सदर शपथपत्रावरुन प्रतिवादी क्र. ४ मयत असल्याबाबत वादी यास

माहिती मिळाली नाही, त्यामुळे विलंब झाला असावा अशी शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे अबेटमेंटचा आदेश रद्द करणे न्यायोचित वाटते. मात्र झालेल्या विलंबाबाबत वादीने प्रतिवादी क्र. ४ च्या वारसांना खर्च देणेबाबत आदेश पारित करणे न्यायोचित वाटते. परिणामी प्रस्तुतचा अर्ज खर्चासह मंजूर होणेस पात्र आहे. सबब, मी खालील आदेश पारीत करीत आहे :

— **आदेश** —

१. अर्ज खर्चासह मंजूर करण्यात येतो.

२. खालील अटीची पुर्तता झाल्यावर अबेटमेंटचा आदेश रद्द करणेत येतो.

३. वादी याने पुढील तारखेपर्यंत खर्चाची रक्कम रुपये ४००/— दयावी. त्यापैकी वादी याने रक्कम रुपये २००/— प्रतिवादी क्र. ४ चे वारस यांना दयावी व उर्वरित रक्कम रुपये २००/— सरकार जमा करावी.

सही/—
( गि. सु. माने )
दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवगड.

स्थळ : देवगड
दिनांक : २६/०९/२०१८